

दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता




vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.५ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 5 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 21 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# सरकारला एका जातीला दुसऱ्या जातीत टाकण्याचा अधिकार नाही

## छगन भुजबळांचा मराठा आरक्षणाच्या जीआर वर आक्षेप

### मराठा समाज सामाजिकदृष्ट्या मागास नाही- भुजबळ

दरम्यान काल माध्यमांशी बोलताना भुजबळ म्हणाले की, सगळ्या आयोगांनी मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागास नाही. हा समाज जो आहे हा आर्थिकदृश्य मागास असेल, शैक्षणिकदृष्ट्या असेल, परंतु हा समाज सामाजिक मागासलेला नाही असे सुप्रीम कोर्टाच्या खंडपीठाने सांगितले आहे. महाराष्ट्रात अनेक मुख्यमंत्री झाले आहेत ज्यांनी मराठा समाजाला मागास मानेल नाही. सारथीच्या माध्यमातून जे ओबीसीला मिळते ते तर दिलेच, त्यापेक्षा अधिक देणे सुरू आहे. वसतीगृहसाठी फुकट दिले आहे. परंतु, ओबीसीला अजूनही लढावे लागत आहे. त्यांना वर्षाला ६० हजार रुपये दिले जातात. आम्हाला अजूनही मागावे लागत आहे. मंडल आयोग हा केंद्र सरकारनेच तयार केला असल्याने २७ टक्के आरक्षण ओबीसीला दिले. त्यानंतर महाराष्ट्रात देशमुख आयोग, बापट आयोग, खत्री आयोग आणि गायकवाड आयोग, यातील गायकवाड आयोग सोडल्यास इतर आयोगांनी निर्णय दिले की मराठा समाज हा सामाजिक दृष्ट्या मागास नाही.



**मुंबई (वृत्तसंस्था)**-कुठल्याही जातीला उचलून दुसऱ्या जातींमध्ये टाकण्याचा अधिकार कुठल्याही सरकारला नाही. काल काढलेल्या जी आर बद्दल आम्ही वकिलांचा सल्ला घेत आहोत, असे मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. आम्ही या संदर्भात न्यायालयात जाणार आहोत, असेही त्यांनी म्हटले आहे.छगन भुजबळ म्हणाले की, मराठा आरक्षणासंदर्भात काल जो जी आर काढण्यात आला त्यांच्याबद्दल आम्ही ओबीसीचे नेते आणि कार्यकर्ते यांच्या मनात फार मोठ्या शंका आहेत. आम्ही विचार करत आहोत, कोण हरले का? कोण जिंकले का?, या बाबत आम्ही वकिलांचा सल्ला घेत आहोत. कारण कुठल्याही जातीला उचलून दुसऱ्या जातींमध्ये टाकण्याचा अधिकार कुठल्याही सरकारला नाही.छगन भुजबळ हे मराठा आरक्षणाच्या जी आरमुळे नाराज झाल्याने त्यांनी आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकल्याची चर्चा आहे. मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी झालेल्या पक्षाच्या बैठकीला छगन भुजबळ उपस्थित होते. मात्र कॅबिनेट बैठकीला हजर नसल्याचे चर्चांना उधाण आले आहे. त्यांनी याबाबत बोलण्यास नकार दिला. मात्र मराठा आरक्षणाच्या जी आरला त्यांचा विरोध असून ते त्याविरोधात कोर्टात जाणार आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.छगन भुजबळ म्हणाले की, मला वाटत आहे की काही लोकं म्हणत होते की हरकती मागवायला हव्या होत्या.काही लोक म्हणतात की ते यांना अधिकार आहे का? आता पाहू ते सगळ आता आम्ही विचार करतो. असा निर्णय होईल अशी आम्हाला काय कुणालाच अपेक्षा नव्हती.

### प्रकाश शेंडगे यांचा सरकारला इशारा

फडणवीस यांच्या आवाहनानंतर ही ओबीसी जन मोर्चाचे अध्यक्ष प्रकाश शेंडगे यांनी उपोषण मागे घेण्यास नकार दिला आहे. शेंडगे म्हणाले की, गॅझेट च्या संदर्भावर आरक्षण मिळत नाही. मराठा समाज सामाजिकदृष्ट्या मागास नसल्याचे पूर्वी चार आयोगांनी स्पष्ट केले आहे आणि मराठा समाज चार प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ घेत आहे, असेही त्यांनी सांगितले. मराठा समाजाच्या नागरिकांच्या कुणबी नोंदी राज्य शासन शोधणार आहे. आम्ही या शासन निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्याचा विचार करत आहोत, असे प्रकाश शेंडगे यांनी स्पष्ट केले आहे

# चित्रनगरीत राबविणार फिल्म स्टडी सर्कल उपक्रम-मंत्री आशिष शेलार यांची घोषणा

## दर्जेदार सिनेरसिक वर्ग निर्माण होईल

**मुंबई | प्रतिनिधी**

प्रतिनिधी अरविंद बनसोडे कुरनूरकर दर्जेदार चित्रपट बघणारा प्रेक्षक वर्ग निर्माण व्हावा. तसेच गाजलेल्या जुन्या चित्रपटाचा आस्वाद सिनेरसिकांना घेता यावा याकरिता आगामी काळात दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या माध्यमातून फिल्म स्टडी सर्कल हा अनोखा उपक्रम राबविणार असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ऍड. आशिष शेलार यांनी बुधवारी केली.ते गणेशोत्सव निमित्त दादासाहेब फाळके चित्रनगरीतील राजाच्या दर्शनासाठी आले असतांना त्यांनी ही घोषणा केली. चित्रनगरीतील गणेशोत्सवाचे यंदाचे ३२ वे वर्ष आहे.महाराष्ट्र शासन सांस्कृतीक कार्य विभाग व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी



आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, चित्रकर्मीच्या उन्नतीसाठी सातत्याने विविध योजना, उपक्रम, अभियान राबवित आहे.या उपक्रमामुळे दर्जेदार चित्रपट बघणारा प्रेक्षक वर्ग निर्माण होईलच मात्र या उपक्रमाच्या माध्यमातून सिनेरसिकांना जुने दर्जेदार मराठी चित्रपट मोठया पद्यावरती बघण्याची पर्वणीच मिळणार आहे.तसेच सह्याद्री वाहिनी आणि महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने सह्याद्री वाहिनीवर दर्जदार मराठी चित्रपट प्रसारित करण्याचा उपक्रमदेखील सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे मराठी सिनेसृष्टीला प्रोत्साहन मिळेल अशी भावना मंत्री.आशिष शेलार यांनी व्यक्त केली.या वेळी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांच्यासह सुप्रसिद्ध दिग्दर्शक-निर्माता सुभाष घई, अभिनेते मिलींद दास्ताना, अभिनेत्री रुपाली गांगुली उपस्थित होते.

# नंदुरबार तालुक्यातील भिलाईपाडा येथे विषबाधेची घटना; आ.डॉ.गावित यांच्याकडून मदतीचे निर्देश

**नंदुरबार | दिपक गोसावी**

नंदुरबार तालुक्यातील भिलाईपाडा गावात एका धार्मिक कार्यक्रमानंतर प्रसाद आणि पिण्याच्या पाण्यातून विषबाधा झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे अनेक ग्रामस्थांना त्रास जाणवू लागल्याने त्यांना तात्काळ नंदुरबार जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



घटनेची माहिती मिळताच आमदार डॉक्टर विजयकुमार गावित यांनी तात्काळ दखल घेतली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली माजी जिल्हा परिषद अध्यक्षा डॉक्टर सुप्रिया गावित आणि माजी जिल्हा परिषद सदस्य अर्चना गावित यांनी जिल्हा रुग्णालयात जाऊन बाधित रुग्णांची विचारपूस केली. त्यांनी रुग्णांना त्वरित आणि योग्य उपचार देण्याचे निर्देश वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले. यावेळी डॉक्टर सुप्रिया गावित यांनी गावातील पाण्याचे नमुने तातडीने तपासणीसाठी जिल्हा परिषद आणि मेडिकल कॉलेजकडे पाठवण्याची सूचना केली. तसेच, सर्व बाधित रुग्णांना पूर्णपणे बरे होईपर्यंत निरीक्षणाखाली ठेवण्यास सांगितले. आमदार डॉक्टर विजयकुमार गावित यांनीही थेट गावच्या सरपंचाशी फोनवर संपर्क साधून, बाधित झालेल्या प्रत्येक ग्रामस्थाला त्वरित रुग्णालयात पोहोचवण्याचे निर्देश दिले. ते स्वतः या संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी माहिती घेत आहेत. या घटनेमुळे गावात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाकडून सर्वतोपरी मदत पुरवली जात आहे.

# दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने जगण्याचा मार्ग

## आ.रघुवंशींच्या आमदार निधीतून ३० ते ४० दिव्यांग बांधवांना ई-बाईकचे वाटप

**नंदुरबार | दिपक गोसावी**

समाजामध्ये दिव्यांग व्यक्तींना समान संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणणे, ही फक्त शासनाचीच नाही, तर समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे. याच भावनेतून, शिवसेनेचे संपर्कप्रमुख तथा आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी त्यांच्या आमदार निधीतून दिव्यांग बांधवांना मदतीचा हात दिला आहे. नंदुरबार नगरपरिषदेत आयोजित एका विशेष कार्यक्रमात, आमदार रघुवंशी यांच्या हस्ते सुमारे ३० ते ४० दिव्यांग व्यक्तींना ३ चाकी इलेक्ट्रिक चार्जेबल सायकलींचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी नगराध्यक्षा रत्ना रघुवंशी यांचीही विशेष उपस्थिती होती. शासनाच्या नियमांनुसार, ८०% पेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तींनाच अशा सायकलींचा लाभ मिळतो. मात्र, आमदार रघुवंशी यांनी शासकीय योजनेतून वंचित राहिलेल्या ७०%



ते ८०% अपंगत्व असलेल्या दिव्यांगांनाही मदत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. या निर्णयामुळे अनेक गरजू व्यक्तींना स्वतःच्या पायावर उभे राहून स्वावलंबी बनण्यास मोठी मदत होणार आहे. यावेळी बोलताना आमदार रघुवंशी म्हणाले की, दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण नेहमीच कटिबद्ध आहोत. त्यांच्या या निर्णयाचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक होत आहे, कारण यामुळे दिव्यांग बांधवांना आत्मनिर्भर बनण्याचा आणि सन्मानाने जगण्याचा मार्ग मिळाला आहे.या कार्यक्रमाला शिवसेना जिल्हाप्रमुख व्होकेट राम रघुवंशी आणि मुख्याधिकारी राहुल वाघ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात अडचणी येणार नाहीत-एकनाथ शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत उपोषण सुरू केले होते. ५ दिवसांच्या उपोषणानंतर अखेर राज्य सरकारने जरांगेंच्या मागण्या मान्य केल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनाने जीआर देखील काढला आहे. परंतु, या जीआरला ओबीसी नेत्यांनी विरोध केला असल्याचे दिसत आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी देखील या जीआरच्या निषेधार्थ आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकला होता. या सगळ्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.एकनाथ शिंदे म्हणाले, हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर आपल्या सरकारने काढला आहे. याबद्दल सविस्तर मी बोललो आहे तसेच मुख्यमंत्री सुद्धा बोलले आहेत. यामध्ये जो निर्णय आम्ही घेतला आहे तो कायद्याच्या चौकटीत बसवून घेतला आहे. त्यामुळे जी काही पद्धत आहे मराठा समाजातल्या कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात जी प्रक्रिया आहे ती अधिक सोपी करणे सुलभ करणे याचा उल्लेख जीआरमध्ये स्पष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे मला असे वाटते की त्याची अंमलबजावणी करण्यात कुठलीही अडचण येणार नाही आणि कुणबी प्रमाणपत्र मराठा समाजाला मिळेल.पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, हे सगळे करत असताना ओबीसी समाजाचे कुठलेही नुकसान होणार नाही, अशी भूमिका सरकारची सुरुवातीपासून आहे. छगन भुजबळ यांच्याशी आम्ही बोलू, मुख्यमंत्री देखील बोलतील आणि जो काही निर्णय घेण्यात आला आहे, त्याची जी काही वस्तुस्थिती आहे त्यांना समजाऊन सांगू. मला वाटते आपण जो काही निर्णय घेतलेला आहे त्याची माहिती आणि वस्तुस्थिती समजून घेतल्यानंतर भुजबळ साहेबांची नाराजी दूर होईल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला आहे.छगन भुजबळ हे मराठा आरक्षणाच्या जीआरमुळे नाराज झाल्याने त्यांनी आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकल्याची चर्चा आहे. मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी झालेल्या पक्षाच्या बैठकीला छगन भुजबळ उपस्थित होते. मात्र कॅबिनेट बैठकीला हजर नसल्याचे चर्चांना उधाण आले आहे. त्यांनी याबाबत बोलण्यास नकार दिला. मात्र मराठा आरक्षणाच्या जीआरला त्यांचा विरोध असून ते त्याविरोधात कोर्टात जाणार आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.तसेच मला वाटत आहे की काही लोक म्हणत होते की हरकती मागवायला हव्या होत्या.काही लोक म्हणतात की ते यांना अधिकार आहे का? आता पाहू ते सगळ आता आम्ही विचार करतो. असा निर्णय होईल अशी आम्हाला काय कुणालाच अपेक्षा नव्हती, अशी प्रतिक्रिया भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.

# शिक्षक




शिक्षक म्हणजे शिस्तप्रिय, क्षमाशील, कलाप्रेमी, ज्ञानाचा सागर.
विद्यार्थ्यांचा तो खरा आधार स्तंभ .।।१।।

शब्दांमधून शिकवण देतो .
अंधारातून प्रकाशाकडे नेतो.
संस्कारांचे बीज पेरतो.
चांगल्या गुणांचा ध्यास धरतो.।।२।।

शिक्षक म्हणजे दिशा दाखविणारा दिशादर्शक
जीवन प्रवास उजळविणारा मार्गदर्शक.
त्याच्या अतुट कष्टांमुळे
शाळेची बाग फुलविणारा निर्देशक.।।३।।

विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा उज्वल प्रवास घडविणारा दीपस्तंभ शिक्षक असतो.ज्ञानदीप पेटविणारा अंधःकार नष्ट करणारा हितचिंतक असतो ।।४।।

विद्यार्थ्यांच्या मनामनात फुलविणारा ज्ञानाचा, संस्कारांचा, मूल्यांचा, कौशल्यांचा, विकास घडवून आणणारा महत्त्वाकांक्षी मळा.
आणि म्हणूनच आमच्या विद्यार्थ्यांना आवडते सह्याद्री विद्यामंदिर शाळा.।।५।।

येथे शिक्षक लावतो विद्यार्थ्यांना मायेचा लळा.
शिक्षक म्हणजे किरण सूर्यप्रकाशाचा,
ज्ञान देतो, स्वीकार करतो नवीन शिक्षण प्रणालीचा.।।६।।

चुकीच्या वाटा दाखवितो थांबवून
योग्य मार्गावर नेतो समजावून .
त्यांच्या शब्दात असते शक्ती,
जीवन घडविण्याची असते भक्ती. शिक्षकांच्या ऋणात जग सारे.
त्यांचा आशीर्वाद घेऊ माथ्यावर
सारे.।।७।।




ज्यांच्या कृपेने आज फुलली ज्ञानफुले,
अशा या गुरुंवर्यांना , शिक्षकदिनी करूया नमन सारे.
कृतार्थभाव अर्पून त्यांच्या चरणी,
होऊया नतमस्तक आज शिक्षकदिनी.
।।८।।

**काव्य लेखन –सौ. संतोषी संपत बांगर. (सहाय्यक शिक्षिका प्राथमिक विभाग)**
**शाळा– सह्याद्री विद्यामंदिर भांडुप पश्चिम.**

# शिक्षक दिन–एक कृतज्ञतेचा सण

भारतामध्ये ५ सप्टेंबर हा दिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी आपल्या आयुष्यात ज्ञानाचे बीज पेरणाऱ्या, योग्य दिशा दाखवणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. हा दिवस डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन असल्याने त्यांच्या सन्मानार्थ शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. डॉ. राधाकृष्णन हे एक महान शिक्षणतज्ज्ञ, तत्त्वज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती होते. त्यांनी शिक्षक या व्यक्तीची महत्ता जगासमोर मांडली होती.शिक्षक म्हणजे केवळ ज्ञान देणारा व्यक्ती नाही, तर तो विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक, प्रेरणास्थान आणि एका चांगल्या समाजाचा शिल्पकार असतो. शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ अशा विविध शिक्षण संस्थांमध्ये शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानच देत नाहीत, तर त्यांच्यामध्ये चांगले संस्कार, आत्मविश्वास, सहकार्य आणि जबाबदारीची भावना विकसित करतात.शिक्षक दिन हा दिवस म्हणजे एक सुवर्णसंधी असते आपल्या शिक्षकांचे आभार मानण्याची. या दिवशी शाळांमध्ये विशेष कार्यक्रम,




भाषण, नृत्य, गीते आणि नाटक इत्यादी आयोजित केली जातात. अनेक ठिकाणी विद्यार्थी शिक्षकांची भूमिका घेतात आणि एक दिवस 'छोटे शिक्षक' बनून पाहतात. हा अनुभव विद्यार्थ्यांना शिक्षकांचे कार्य किती कठीण आणि महत्त्वाचे आहे, हे शिकवतो.आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांचे कार्य अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. ऑनलाइन शिक्षण, डिजिटल पद्धती, सतत बदलणारे अभ्यासक्रम – या सर्व गोष्टींचा योग्य समन्वय साधून शिक्षक विद्यार्थ्यांना आधुनिक जगासाठी तयार करत आहेत. त्यामुळे शिक्षकांचे योगदान पूर्वीप्रमाणेच नव्हे, तर कदाचित अधिक महत्त्वाचे झाले आहे.शिक्षक दिन आपल्याला एक गोष्ट निश्चितपणे शिकवतो – ती म्हणजे शिकणे ही प्रक्रिया आयुष्यभराची आहे आणि या प्रवासात शिक्षक हे दीपस्तंभासारखे असतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आपण अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करतो.शिक्षक दिन हा दिवस एक आनंदाचा, अभिमानाचा आणि कृतज्ञतेचा दिवस आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या शिक्षकांचा आदर केला पाहिजे आणि त्यांच्या शिकवणीने प्रेरणा घेत आपल्या जीवनात यश मिळवावे, हीच खरी गुरु–दक्षिणा ठरेल.

**–हेमंत तापीराम सुर्यवंशी उपशिक्षक राणाप्रताप इंग्लिश स्कूल प्रतापपूर तालुका तळोदा जिल्हा नंदुरबार**

# पारंपरिक वाद्य आणि कला पथकाच्या साथीने केज मध्ये निघाली सराफा गणेश मंडळाची मिरवणूक

## ना डीजे ना,कर्णकर्कश आवाज फक्त पारंपरिक वाद्य !

**केज । गौतम बचुटे**

केज येथील सोनार गल्लीतील सुवर्णकार गणेश मंडळाची मिरवणूक ही पारंपरिक वाद्य आणि पारंपरिक कला पथकाच्या साथीने काढण्यात आली.

या बाबतची माहिती अशी की, केज शहरातील सोनार गल्ली येथील सुवर्णकार गणेश मंडळाच्या श्री गणेशाचे विसर्जन दि. ४ सप्टेंबर रोजी करण्यात आले. यावेळी श्रीच्या मिरवणुकीत डी जे आणि कर्णकर्कश आवाजातील वाद्य यांचा वापर टाळून पारंपारिक कला पथके आणि पारंपरिक वाद्य यांचा वापर करण्यात आला. सजविलेल्या रथात श्री गणरायांची भव्य देखणी अशी मूर्ती ठेवून या शिस्तबद्धपणे पार पडलेल्या मिरवणुकीत ढोल,




ताशा, हलगी, लेझीम पथक, मयुर नृत्य यासह सहभागी असलेले पारंपरिक वेशातील वासुदेवाचे कलापथक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. विसर्जन मिरवणुकी मंडळाचे अध्यक्ष गोविंद कणसे, संजय रोडे यांच्यासह सराफा व्यावसायिक बांधव सहभागी झाले होते.

आदेशाचे केले तंतोतंत पालन :– श्री विसर्जन मिरणुकीत आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन टाळण्यात यावे अशा सूचना पोलिस प्रशासनाने सर्व गणेश मंडळ आणि गणेश भक्तांना दिल्या आहेत. नियमांचे व अटींचे उल्लंघन झाल्यास कारवाई करण्याचे देखील सूचना दिल्या आहेत. त्याचे तंतोतंत पालन सुवर्णकार गणेश मंडळाने केले.

ऱ्हास होत असलेल्या कला आणि कलावंतांना प्रोत्साहन :– सुवर्णकार गणेश मंडळाने लेझीम आणि वासुदेव या कला आता काळाच्या ओघात लुप्त होत असताना श्री गणेशाच्या मिरवणुकीत त्याचा खुबीने वापर करून शहरवासीयांना त्याचा आनंद घेण्यासाठी संधी दिली. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# भटक्या कुत्र्यांना आवरणे गरजेचे

पुणे ही महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि शैक्षणिक राजधानी म्हणून ओळखली जाते. पण, गेल्या काही वर्षांपासून भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या समस्येसाठीही चर्चेत आहे. शहराचा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि कचरा व्यवस्थापनातील त्रुटींमुळे भटक्या कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या नागरिकांना या समस्येचा सर्वाधिक फटका बसत आहे.पुणे महानगरपालिका आणि स्वयंसेवी संस्थांनी या समस्येवर मात करण्यासाठी अनेक उपाययोजना हाती घेतल्या असल्या, तरी ही समस्या पूर्णपणे नियंत्रणात येण्यासाठी अजूनही बराच पल्ला गाठायचा आहे. समस्येचे स्वरूप आणि आकडेवारी पुणे शहरात भटक्या कुत्र्यांची समस्या गंभीर बनली आहे. २०२४ मध्ये, जानेवारी ते नोव्हेंबर या ११ महिन्यांच्या कालावधीत, तब्बल २३,३७४ नागरिकांवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या नोंदी आहेत. यापैकी जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांतच १८,९६० घटना घडल्या, म्हणजेच दरमहा सुमारे २,००० नागरिकांचा कुत्र्यांनी चावा घेतला. या आकडेवारीवरून या समस्येचे गांभीर्य लक्षात येते. विशेषतः आंबेगाव पठार, कोथरूड, बाणेर, बालेवाडी आणि पिंपरी–चिंचवड परिसरात कुत्र्यांचे हल्ले वाढले आहेत. ही समस्या केवळ हल्ल्यांपुरती मर्यादित नाही. भटक्या कुत्र्यांमुळे रस्त्यांवर घाण, रात्रीच्या वेळी भुंकण्याचा त्रास आणि रेबीजसारख्या आजारांचा धोका वाढला आहे. शहरातील कचऱ्याचे ढीग, उघड्यावर टाकलेले अन्न आणि काही नागरिकांचे कुत्र्यांना खाऊ घालण्याचे सौजन्य यामुळे त्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. याशिवाय, पुण्याच्या उपनगरांमध्ये, जसे की पिंपरी–चिंचवड, भटक्या कुत्र्यांची संख्या १५,००० पेक्षा जास्त असल्याचा अंदाज आहे, ज्यामुळे तेथील नागरिकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. भटक्या कुत्र्यांच्या समस्येचे मुळ शहरीकरण, कचरा व्यवस्थापनातील त्रुटी आणि सामाजिक वर्तन यात दडलेली आहेत. पुणे शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना, नवीन गृहसंकुले, रस्ते आणि व्यावसायिक क्षेत्रे वाढली; परंतु कचरा व्यवस्थापन आणि प्राणी नियंत्रण यंत्रणा त्याच गतीने विकसित झालेली नाही. रस्त्यांवर आणि कचराकुंड्यांजवळ उघड्यावर टाकलेले अन्न भटक्या कुत्र्यांसाठी सहज उपलब्ध



अन्नस्रोत बनले आहे. यामुळे त्यांची प्रजनन क्षमता वाढली आहे. शिवाय, काही प्राणीप्रेमी नागरिक भटक्या कुत्र्यांना खाऊ घालतात, ज्यामुळे त्यांची संख्या नियंत्रित करणे कठीण झाले आहे.दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे नसबंदी आणि लसीकरण कार्यक्रमांची अपुरी अंमलबजावणी. पुणे महानगरपालिकेने भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नसबंदी आणि रेबीज लसीकरणाचे कार्यक्रम हाती घेतले असले, तरी त्याची गती आणि व्याप्ती अपुरी आहे. उदाहरणार्थ, २०२४ मध्ये एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत ३७,४८६ कुत्र्यांवर नसबंदी आणि लसीकरण करण्यात आले; परंतु ही संख्या शहरातील एकूण भटक्या कुत्र्यांच्या तुलनेत कमी आहे. प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रयत्न पुणे महानगरपालिका आणि विविध स्वयंसेवी संस्थांनी या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी काही उपाययोजना हाती घेतल्या आहे. पशुवैद्यकीय विभागाने भटक्या कुत्र्यांची ऑनलाइन नोंदणी आणि त्यांच्यावर रेबीज तपासणी करून नसबंदी आणि लसीकरणाचे कार्यक्रम राबवले आहे. कुत्र्याला रेबीज नसल्याची खात्री झाल्यावर त्याला मूळ ठिकाणी सोडले जाते. याशिवाय, काही स्वयंसेवी संस्था, जसे की मिशन रेबीज आणि रेस्क्यू फाऊंडेशन, भटक्या कुत्र्यांचे पुनर्वसन आणि लसीकरणासाठी कार्यरत आहे. मात्र, या उपाययोजनांना काही मर्यादा आहे. नसबंदी आणि लसीकरण कार्यक्रमांना निधीची कमतरता, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव आणि नागरिकांचा अपुरा सहभाग यामुळे अडथळे येतात. शिवाय, प्राणी कल्याण कायद्यांनुसार भटक्या कुत्र्यांना मारणे किंवा त्यांना ठार मारणे बेकायदेशीर आहे, त्यामुळे प्रशासनाला केवळ नसबंदी आणि लसीकरण यावरच अवलंबून राहावे लागते. यामुळे तत्काळ परिणाम दिसून येत नाहीत. नागरिकांचा दृष्टिकोन आणि तक्रारी भटक्या कुत्र्यांच्या समस्येमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. विशेषतः सोसायट्यांमध्ये राहणारे नागरिक, ज्यांच्या मुलांना किंवा वृद्धांना कुत्र्यांचा धोका आहे, यांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. रात्रीच्या वेळी भुंकण्याचा त्रास आणि रस्त्यांवरील घाण यामुळेही नागरिक त्रस्त आहेत. दुसरीकडे, प्राणीप्रेमी गटांचा असा युक्तिवाद आहे की, भटक्या कुत्र्यांना मारणे हा उपाय नाही; त्याऐवजी त्यांचे व्यवस्थापन आणि पुनर्वसन यावर भर द्यावा लागेल. प्रस्तावित उपाययोजना भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर मात करण्यासाठी एक सर्वसमावेशक आणि दीर्घकालीन धोरणाची आवश्यकता आहे.प्रभावी कचरा व्यवस्थापन : शहरातील कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास भटक्या कुत्र्यांसाठी अन्नस्रोत कमी होईल. कचराकुंड्या बंदिस्त करणे आणि नियमित कचरा उचलण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. नसबंदी आणि लसीकरण कार्यक्रमांची गती वाढवणे : महापालिकेने नसबंदी आणि लसीकरण कार्यक्रमांसाठी निधी आणि मनुष्यबळ वाढवावे. यासाठी स्वयंसेवी संस्था आणि खासगी क्षेत्राशी सहकार्य वाढवावे. जनजागृती मोहीम : नागरिकांना भटक्या कुत्र्यांना खाऊ घालण्याचे दुष्परिणाम आणि त्यांचे व्यवस्थापन कसे करावे याबाबत जागरूक करणे आवश्यक आहे. यासाठी स्थानिक शाळा, महाविद्यालये आणि सोसायट्यांमध्ये मोहिमा राबवाव्यात. प्राणी आश्रयस्थानांची निर्मिती : भटक्या कुत्र्यांसाठी आश्रयस्थाने उभारून त्यांचे पुनर्वसन करणे हा एक दीर्घकालीन उपाय ठरू शकतो. यामुळे त्यांची संख्या नियंत्रित होईल आणि नागरिकांचा त्रास कमी होईल. कायदेशीर चौकट मजबूत करणे : प्राणी कल्याण कायद्यांचे पालन करताना, नागरिकांच्या सुरक्षेलाही प्राधान्य देणारी धोरणे आखणे गरजेचे आहे. यासाठी स्थानिक प्रशासन, प्राणीप्रेमी आणि नागरिक यांच्यात समन्वय आवश्यक आहे. पुणे शहरातील भटक्या कुत्र्यांची समस्या ही केवळ प्रशासकीय नव्हे, तर सामाजिक आणि पर्यावरणीय आव्हान आहे. ही समस्या सोडवण्यासाठी प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्यातील सहकार्य महत्त्वाचे आहे. नसबंदी, लसीकरण, कचरा व्यवस्थापन आणि जनजागृती यांसारख्या उपाययोजनांद्वारे या समस्येवर नियंत्रण मिळवता येईल. पुणे हे सांस्कृतिक आणि शैक्षणिक केंद्र आहे; परंतु ही समस्या सोडवली नाही, तर शहराच्या प्रगतीला आणि नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. यासाठी सर्वांनी एकत्र येऊन ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

# केज येथील भुमीपुत्र मारुफ शेख सेट परिक्षेत उत्तीर्ण, मित्र मंडळी कडून शुभेच्छांचा वर्षाव

**केज । प्रतिनिधी**

केजशहरातील भुमीपुत्र भारुड शेख हे सहाय्यक प्राध्यापक पदासाठी पात्रता परीक्षा युजीसी द्वारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत घेण्यात आलेल्या सेट परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे.लोक प्रशासन पब्लिक एडमिनिस्ट्रेशन या विषयात सेटपरिक्षेत केज तहसील कार्यालयातील ग्राम महसूल अधिकारी फजलभाई शेख यांचे चिरंजीव मारुफ शेख यांनी यश मिळविले आहे.त्यांच्या या यशा बद्दल मारुफ शेख यांचे मित्र परिवार यांनी अभिनंदन करुन पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच शेख परिवाराचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.



# दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तळा धम्मप्रवचन मालिकेचे दहावे पुष्प अनंत मोरे यांनी गुंफले



**माणगाव । प्रतिनिधी**

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तालुका शाखा तळा व बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा व उपशाखा तळा यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय बौद्ध महासभा कार्यलय ता.तळा या ठिकाणी वार रविवार ३१ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ०२:०० वा.वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे दहावे पुष्प भारतीय बौध्दमहासभा तालुका तळा अध्यक्ष रामदास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गुंफण्यात आले. वर्षावास धम्मप्रवचनाचे सुत्रपठण सामुदायिकरित्या केले. याप्रसंगी संस्थेने ठरवून दिलेला वर्षावास मालिकेचा विषय विश्वगुरु तथागत गौतम बुध्द या विषयावर बौध्दजन पंचायत समिती तालुका तळा अध्यक्ष व प्रवचनकार अनंत मोरे यांनी प्रवचन दिले, तथागत बुद्धांचा धम्म करुणा, मैत्री, प्रज्ञा व शील यावर अवलंबून आहे, बुद्धांनी दिलेला धम्म तर स्वतःप्रत आत्मसात केला तर आपले मानवी जीवन सुखमय होते असे प्रतिपादन अनंत मोरे यांनी केले. तथागत बुध्द हे जगातील पहिले मनोवैज्ञानिक होते असे सांगितले. तथागत बुद्धाला जगाने शांतीचे प्रतिक म्हणून स्वीकारलं आहे,आजही भारताची ओळख बुद्धांच्या नावाने आहे. अशी अनेक उदाहरणे देवून हा विषय समजावून सांगितला. या प्रसंगी पल्लवी सकपाळ यांनी देखील आपले मनोगत मांडले, या संपूर्ण प्रवचनमालिकेचे सूत्रसंचलन बौध्दजन पंचायत समिती शाखा क्र.४ चे अध्यक्ष संदेश पवार यांनी केले व आभारप्रदर्शन भारतीय बौध्दमहासभा संघटक यश जसवलकर यांनी केले व अध्यक्षीय मनोगत भारतीय बौध्दमहासभा तालुका शाखा तळा अध्यक्ष रामदास शिंदे यांनी केले व तद्नंतर धम्मप्रवचनाचा समारोप झाला.

# जिल्ह्यात गोवर-रुबेला लसीकरण मोहिमेची जोरदार तयारी

## जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते: एकही विद्यार्थी लसीकरणापासून वंचित राहू नये



**धुळे । प्रतिनिधी**

धुळे जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळा व मदरशांमध्ये १५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत गोवर-रुबेला लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेतून एकाही विद्यार्थ्याचा अपवाद होऊ नये, यासाठी आरोग्य विभागाने काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय कृती दलाच्या अध्यक्षा भाग्यश्री विसपुते यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय टास्क फोर्स समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी विसपुते यांनी स्पष्ट केले की, राज्यातील काही जिल्ह्यांतील आश्रमशाळांमध्ये गोवरचे रुग्ण आढळले असून हा आजार प्रामुख्याने लहान मुलांमध्ये दिसतो. त्यामुळे शासनाने विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये जिल्ह्यातील सर्व अनुदानित व विनाअनुदानित समाजकल्याण व आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळा तसेच मदरशांतील ५ ते १५ वर्षे वयोगटातील बालकांना लस दिली जाणार आहे.

या मोहिमेसाठी आरोग्य विभागाने सूक्ष्म नियोजन करून एका दिवसात एका आश्रमशाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण करावे. लसीकरणानंतर कुठल्याही प्रकारची गुंतागुंत होऊ नये, याची दक्षता घ्यावी. शाळांनी पालकांना पूर्वसूचना द्यावी तसेच पुरेशा लसींचा साठा, स्वतंत्र लसीकरण कक्ष, म्ब्युलन्स आणि प्रतिक्षा कक्षाची व्यवस्था करावी. जनजागृती मोहिमा राबवून पालकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला व बालकल्याण विभाग तसेच सामाजिक कार्यकर्ते व स्वयंसेवी संस्थांचा समन्वय घेऊन ही मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगावकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त संजय सैंदाणे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. किरण कुवर, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी मालसिंग पावरा, महापालिका वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा कुलकर्णी यांच्यासह सर्व तालुका वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.यावेळी डॉ. सचिन बोडके यांनी मोहिमेची सविस्तर माहिती दिली. लसीकरण मोहिमेदरम्यान शाळांमध्ये सुरक्षिततेच्या सर्व उपाययोजना केल्या जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीच्या शेवटी जिल्हास्तरीय कृती दलाने एकमुखाने ठरविले की, संपूर्ण जिल्ह्यात ही मोहीम काटेकोरपणे अंमलात आणून एकाही विद्यार्थ्याला लसीकरणापासून वंचित ठेवले जाणार नाही.

# महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता

## मराठवाड्यासह विदर्भ व कोकणाला अलर्ट जारी



**मुंबई (वृत्तसंस्था)**–आजपासून महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीसाठी जोरदार पावसाचा 'अलर्ट' जारी केला आहे. याशिवाय, पुणे, सातारा आणि कोल्हापूरच्या घाटमाथ्यावर पावसाचा 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे.भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात सध्या चक्रवाताची स्थिती सक्रिय आहे. पुढील २४ तासांत हे वारे वायव्य दिशेला सरकून, वायव्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, मध्य महाराष्ट्र, कोकण, गोवा किनारपट्टीसह मराठवाडा आणि विदर्भात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. गेल्या महिन्यापासून महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढलेला असून, सप्टेंबरच्या सुरुवातीलाही तो कायम राहणार आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, समुद्राच्या तळाशी मान्सूनच्या द्रोणीय परिस्थितीमुळे कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे, तर राजस्थानच्या मध्य भागात चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. यामुळे, २ सप्टेंबरपासून बंगालच्या खाडीवरही एक नवीन कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता असून, याचा परिणाम म्हणून देशाच्या विविध भागांत जोरदार पाऊस पडेल.येत्या सात दिवसांत गुजरातसह महाराष्ट्रातील कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. २ आणि २ सप्टेंबर रोजी कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मुसळधार पाऊस अपेक्षित आहे. तर ३, ४ आणि ५ सप्टेंबर रोजी कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.सिंधुदुर्ग रत्नागिरी रायगड तसेच पुणे सातारा कोल्हापूर घाटमाथ्यावर हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट दिला आहे. विदर्भातील चंद्रपूर व गोंदिया जिल्ह्यालाही ऑरेंज अलर्ट आहे .मुंबई, ठाणे, पालघर ,नाशिक ,नगर ,पुणे, बीड, परभणी, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर, संपूर्ण विदर्भात पावसाचा येलो अलर्ट देण्यात आलाय .उत्तर महाराष्ट्रात नंदुरबार, धुळे, जळगाव जिल्ह्यातही तुफान पावसाची शक्यता आहे.

# आज संपूर्ण महाराष्ट्रासाठी सोन्याचा दिवस

## भावना व्यक्त करताना जरांगेंना अश्रू अनावर

**मुंबई (वृत्तसंस्था)**–संपूर्ण महाराष्ट्रासाठी विशेषतः मराठवाड्यासाठी आज सोन्याचा दिवस आहे. माझ्या समाजाचे कल्याण झाले. हा माझ्या समाजासाठी सुवर्णक्षण असून आज दिवाळी साजरी करा, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मराठा आरक्षणासाठीचा शासन निर्णय आल्यानंतर मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेतले. तसेच यावेळी मनोज जरांगे भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटलांनी आधी मसुदा दिला व त्यानंतर एक तासात जीआर देखील आला. यावेळी मनोज जरांगे यांनी व्यवस्थित पडताळून जीआर वाचले. तसेच वकिलांच्या मार्फत सुद्धा सगळे जीआर व्यवस्थित तपासून घेतले. तसेच मागच्या ७५ वर्षात विजय झाला नसेल असा विजय मराठ्यांचा झाला आहे, असे जरांगे यांनी म्हटले. यावेळी मराठा बांधवांनी 'पाटील.. पाटील' अशा घोषणाबाजी देखील केल्या.मनोज जरांगे यांनी उपोषण सोडल्यानंतर मराठा बांधवांनी गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा केला. जरांगे यांनी यावेळी मराठा आंदोलकांना आपापल्या गावी सांभाळून जा, असे निर्देश दिले. मनोज जरांगे यांना आता रुग्णालयात नेण्यात येणार असून ५



दिवसांच्या उपोषणामुळे त्यांची प्रकृती खराब झाली असून उपचार सुरू करण्यात येणार आहेत.दरम्यान, मनोज जरांगे यांनी मुंबईच्या आझाद मैदानावरील उपोषण संपल्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने त्यांच्या जवळपास सर्वच मागण्या मान्य केल्या आहेत. त्यासंबंधीचे जीआरही सरकारने काढले आहे. त्यामुळे जरांगेंनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हातून लिंबू सरबत घेऊन आपले उपोषण सोडले. यामुळे गत शुक्रवारपासून सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा तिढा यशस्वीपणे सुटला आहे.

# मराठा आरक्षण निर्णय हा अभ्यासपूर्ण, श्रेयासाठी नाही–तटकरे यांची स्पष्ट भूमिका



**मुंबई (वृत्तसंस्था)**–मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने घेतलेला निर्णय हा कोणत्याही राजकीय श्रेयासाठी नसून, सखोल अभ्यास व व्यापक चर्चे-नंतरच घेतलेला आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केले आहे.खासदार सुनील तटकरे यांनी म्हटलंय की, महायुतीतील सर्व पक्षांनी एकत्रितपणे हा निर्णय घेतला असून, यामध्ये कोणतीही श्रेयस्पर्धा नसावी. ओबीसी समाजात निर्माण झालेल्या शंका व भावना यांवर सरकारने खुली माहिती देत समाधान करावे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. तसेच, ओबीसी आरक्षणाला कुठलाही धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची आमची भूमिका कायम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सुनील तटकरे म्हणाले की, मराठा आरक्षणाबद्दल महायुती सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्याचा तपशील पाहिला तर प्रत्येकाच्या मनात वेगवेगळ्या शंका असू शकतात. मराठा समाजाच्या मनातील शंका दूर करण्याचा प्रयत्न राज्य सरकारने नक्कीच केला आहे. ओबीसी संघटनेच्या मनामध्ये काही शंका असतील किंवा आरक्षणातून नेमके काही जाणार आहे की काय हे त्यांचा अभ्यास केल्यावरच कळू शकेल.सुनील तटकरे म्हणाले की, लोकशाही आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामध्ये प्रत्येकाला आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. ओबीसी संघटनेच्या याबद्दल काही भावना असू शकतात.घेतलेल्या निर्णया बद्दलचे नेमके त्यांच्या आरक्षणाचे बाबतीमध्ये काय घडणार आहे हे जाणून घ्यायचे असेल तर सरकारने त्यांचे म्हणणे ऐकून घेत संपूर्ण माहिती दिली पाहिजे.

# ज्या देवेंद्र फडणवीसांना तुम्ही टार्गेट केले त्यांनीच तुम्हाला न्याय दिला–नीतेश राणे



**मुंबई (वृत्तसंस्था)**–मराठा समाजाची जुनी मागणी होती, मराठवाड्यात कुणबी नोंदी होत्या. त्यांना आरक्षण द्यावे. हैदराबाद गॅझेट प्रमाणे तो निर्णय आमच्या सरकारने घेतला आहे. जेव्हा जेव्हा मराठा समाजाने गुलाल उधळला, तो फक्त देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या कालावधीमध्ये. मराठा समाजाने याची दखल घेतली पाहीजे. प्रत्येक मराठा समाजातील नागरिकांनी देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले पाहिजे, अशी प्रतिक्रिया भाजप नेते व मंत्री नीतेश राणे यांनी दिली आहे.मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन सुरू असताना केलेल्या भाषणात त्यांनी नीतेश राणे यांना 'चिचुंद्री' असे संबोधले होते. चिचुंद्रीचे कधी पाय मोजता आले आहे का? तिचा पायाचा मेळच लागत नाही. चिंचुद्री सर्व ऋतूत लाल असते. शिवाय ती काय म्हणते हे देखील कळत नाही. त्यामुळे एकदा आंदोलन संपू द्या, नीतेश राणेंना बघतोच, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला होता.मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आईबाबत अपशब्द वापरले होते. त्यानंतर नीतेश राणे यांनी मनोज जरांगे यांच्यावर टीका केली होती. जे रक्ताने मराठा असतात ते कधीच कुणाच्या आईबद्दल अपशब्द वापरत नाहीत. ज्या छत्रपती शिवाजी महाराजांचा आपण आदर करतो, त्यांनीही कायम कोणाच्याही आई-बहिणींचा आदर केला. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाची लढाई लढावी. मात्र, आमच्या देवेंद्र फडणवीस साहेबांच्या आईबद्दल अपशब्द उच्चारण्याची हिंमत कोणी करत असेल तर ती वळवळणारी जीभ हातात काढून देण्याचे सामर्थ्य आमच्यासारख्या ९६ कुळी मराठ्यांमध्ये आहे.आंदोलन मागे घेतल्यानंतर नीतेश राणे यांनी मनोज जरांगे यांचे कान टोचले आहेत.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत लोक चळवळ उभी करण्यासाठी ठाण्यात कार्यशाळा संपन्न







**ठाणे । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत लोकचळवळ उभी करण्यासाठी जिल्हा स्तरावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दि. ३ सप्टेंबर, २०२५ रोजी ठाणे येथील बी. जे. हायस्कूल सभागृह, टेंभी नाका येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या शासनाच्या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत जिल्हास्तर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत जिल्हा परिषदेबरोबरच जिल्ह्यातील सर्व विभागांचे प्रतिनिधी, अधिकारी व पदाधिकारी उपस्थित राहून अभियानाची उद्दिष्टे, भूमिका व जबाबदाऱ्या यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामविकासाला गती देऊन प्रत्येक गावात शाश्वत विकास साधण्यावर भर देण्यात आला.

ग्रामपंचायतींनी पीएम आवास, जलसंधारण व महसुलाशी संबंधित काम वेळेत करावे. समन्वय ठेवावा तसेच ग्रामपंचायतीना अभियानात पात्र होण्यासाठी गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांनी पुढाकार घेऊन ग्रामस्थांना योजनांची अचूक माहिती द्यावी. या कार्यशाळेत मनरेगा अंतर्गत घरकुल, पशुवैद्यकीय दवाखाने व सार्वजनिक मत्ता यांचे नोंदी व सुस्थितीत असल्याची दक्षता घेण्याबाबत सुचना दिल्या. महिला बचतगट, बांबू लागवड उपक्रम तसेच त्यासाठी बाजारपेठ उभारणी, आरोग्य व पायाभूत सुविधांसाठी मिशन कायाकल्पांतर्गत योजना प्रभावीपणे राबवावे. सौरदिवे, ई-लायब्ररी सारखे जिल्ह्यात नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्यासाठी जिल्हा परिषदेने पुढाकार घ्यावा. तसेच सर्व गांमपंचायतींना मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांत सहभागी होण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ग्रामविकासाची खरी ताकद लोकसहभागात असल्याचे सांगून प्रत्येक ग्रामपंचायतीने स्वनिधी, जलसमृद्धी, घरकुल, पशुवैद्यकीय दवाखाने, सार्वजनिक मत्ता व उपजीविका योजनेसारख्या उपक्रमांवर ठोस कामकाज करावे, असे आवाहन केले. त्यांनी स्वामित्व योजना, मिशन कायाकल्प, आरोग्य सुधारणा आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करून ग्रामपंचायतींनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात जल्लोषाने सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यशाळेत सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण, संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभागातून लोकचळवळ, नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच विविध मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. स्वनिधी निर्मिती व लोकवर्गणीद्वारे ग्रामपंचायतींचे आर्थिक सक्षमीकरण, पाणीपुरवठा, जलसंधारण व पर्यावरण संवर्धन, शेततळे व घरकुल बांधकाम योजनेशी अभिसरण, ग्रामपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण आणि महिला बचतगट, शेतकरी व दुर्बल घटकांसाठी ठोस उपाययोजना यावर विशेष भर देण्यात आला.

# धनेगाव फाट्यावर हॉटेल सह्याद्रीवर अप्पर पोलीस अधिक्षकांची जुगार अड्ड्यावर धाड!

## ३ लाख ६३ हजाराचा मुददेमाल जप्त



**केज (गौतम बचुटे)–अंबाजोगाई उपविभागाच्या अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके यांच्या पथकाने केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत धनेगाव फाटा येथील हॉटेल सह्याद्रीमध्ये चालत असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा मारून रोख रकमेसह ३ लाख ६३ हजार ८०० रु. चा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.**

या बाबतची माहिती अशी की, अंबाजोगाई विभागाच्या अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके यांना माहिती मिळाली की, युसुफवडगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत धनेगाव येथील मांजरा प्रकल्पाकडे जाणाऱ्या धनेगाव फाटा येथे असलेल्या हॉटेल सह्याद्रीमध्ये जुगार सुरू आहे. माहिती मिळताच अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके यांच्या पथकातील सहायक पोलीस निरीक्षक ठाकुर, पोलिस हवालदार वचिष्ठ कदम, पोलिस हवालदार देवानंद देवकते, पोलिस हवालदार तानाजी तागड, पोलिस हवालदार महादेव सातपुते, पोलिस हवालदार बाबुराव सोडगीर, पोलिस हवालदार उल्हास राठोड यांनी दि. ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५:३० वा. च्या सुमारास अंबाजोगाई ते युसुफवडगाव जाणारे रोडवरील धनेगाव पाटीचे पुर्वेस हॉटेल सहयाद्रीवर छापा टाकला. या वेळी हॉटेल सह्याद्रीमध्ये विनापरवाना व बेकायदेशिरित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत असलेले जुगारी अशोक आश्रुबा सोनवणे (रा.धनेगाव ता. केज़), बसलिंग बाबुराव वाळके (रा. नायगाव ता. केज), विजयसिंह हरीभाऊ गायकवाड (रा.आनंदगाव (सा.) ता.केज), कल्याण श्रीकृष्ण रांजणकर (रा. सुकळी ता. केज), ईश्वर विठठल चौधरी (रा.पैठण ता. केज), जनक शाहुराव गव्हाणे वय ३७ वर्षे (रा. माळेगाव ता. केज), लक्ष्मण विश्वनाथ पोटभरे (रा.धनेगाव ता. केज), जयद्रथ मुकूंद आव्हाड (रा. साळेगाव ता. केज) या ८ जणांना ताब्यात घेऊन त्यांचे कडुन नगदी रोख रक्कमेसह जुगाराचे साहित्य, ६ मोबाईल आणि ६ मोटार सायकली असा एकूण ३ लाख ६३ हजार ८०० रु. चा मुद्देमाल जप्त केला. पोलीस हवालदार संजय राठोड यांचे फिर्यादी वरुन आठ जुगाऱ्यासह हॉटेल सह्याद्रीचा मालक शामसुंदर दत्तोबा खोडसे (रा. नायगाव ता. केज) यांचे विरुध्द पोलीस ठाणे युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गरिबीवर मात! कुडाच्या झोपडीतून थेट खाकी वर्दीपर्यंतचा माल्या पाडवी यांचा संघर्ष

**मोलगी | रवींद्र वळवी**

अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून बाहेर पडून शिक्षण आणि सरकारी नोकरी मिळवणारे माल्या कुता पाडवी यांचा जीवनप्रवास अनेकांसाठी प्रेरणास्रोत बनला आहे. मोलमजुरी करणाऱ्या कुटुंबातील एका मुलाने केवळ जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवून दाखवले आहे.

धडगाव तालुक्यातील सुरवाणी गावातील रहिवासी माल्या कुता पाडवी यांच्या आई-वडिलांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. वडील कोता पाडवी आणि आई माकली पाडवी मोलमजुरी करून कसेतरी कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत असत. गरिबीमुळे माल्या यांना चौथीनंतर शिक्षण सोडावे लागले आणि कुटुंबाला हातभार लावण्यासाठी ते मोलमजुरी करू लागले. जवळपास तीन वर्षे शिक्षण थांबले असताना, त्यांच्यातील शिकण्याची इच्छा मोहनलाल वळवी यांच्या नजरेत आली. त्यांच्या प्रेरणेने



माल्या पुन्हा शाळेत परतले.

दहावीसाठी फॉर्म नंबर १७ भरत माल्या यांनी खासगी विद्यार्थी म्हणून माध्यमिक विद्यालय, सुरवाणी येथून दहावीची परीक्षा दिली आणि यशस्वी झाले. त्यानंतर नंदुरबार येथील यशवंत ज्युनियर कॉलेजमधून त्यांनी अकरावी आणि बारावीचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षणासोबतच त्यांनी नोकरी मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले. सुरुवातीला त्यांना होमगार्ड म्हणून काम करण्याची संधी मिळाली, आणि याच काळात त्यांनी मुक्त विद्यापीठातून कला शाखेची पदवीही संपादन केली.आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करत माल्या यांनी सरकारी नोकरीसाठीची तयारी सुरू ठेवली. अखेर, त्यांच्या मेहनतीला फळ मिळाले. २५ ऑक्टोबर २०२४ रोजी त्यांची राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ६ धुळे येथे निवड झाली. सध्या ते प्रशिक्षण पूर्ण करून आपले कर्तव्य बजावत आहेत. माल्या यांचे घर आजही कुडाचे एक साधे झोपडे आहे, जिथे गरजेपुरत्या वस्तू वगळता काहीच नाही. पण याच साध्या घरातून बाहेर पडून माल्या यांनी शिक्षण आणि नोकरीच्या माध्यमातून आपले भविष्य घडवले. त्यांचा हा संघर्षमय प्रवास केवळ एका व्यक्तीचे यश नसून, गरिबी आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशस्वी होण्याची जिद्द दाखवणाऱ्या प्रत्येकासाठी एक प्रेरणादायी गाथा आहे.

# घरकुल चे नवीन हप्ते १ला, व २रा, ३रा तात्काळ वाटप करा शिष्टमंडळाची मागणी

## १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती दिना दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे निदर्शन

**बीड | प्रतिनिधी**

बीड शहर नगरपालिका परिसरातील पहिला दुसरा तिसरा थकीत हत्या साठी शिष्टमंडळांनी घेतली शेवटची भेट दि. ४ सप्टेंबर २०२५ रोजी शिष्टमंडळाने पुन्हा एकदा न.प.मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची समक्ष भेट घेऊन रमाई घरकुल आवास योजनेचे थकित आणि नवीन हप्ते पहिला दुसरा आणि तिसऱ्याची तात्काळ वाटप करावी अशी मागणी करण्यात आली आहे. रमाई घरकुल योजनेचा पहिला दुसरा आणि तिसरा हप्ता तात्काळ न दिल्यास १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती दिना दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे निदर्शने करण्यात येतील असा इशारा शिष्टमंडळाने



न.प. मुख्याधिकारी शैलेश पडसे यांना देण्यात आला. सदरिल शिष्टमंडळात सर्व चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक उपस्थित होते त्यात बबन वडमारे,गणेश वाघमारे,अँड.राहुल मस्के अशोक वीर,भीमराव वाघचौरे, विकास,जोगदंड अमोलजी पोळ,विनोद सवाई, स्वप्निल हातागळे इत्यादी यावेळी भारत सोननर पण उपस्थित होते. न.प.मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी शिष्टमंडळास रमाई घरकुल योजनेचे हप्ते तात्काळ वाटप करण्याचे आश्वासन दिले आहे.

# मराठा आरक्षण लढ्यात सहभागी मराठा सेवकांचा श्री सप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थे कडून सत्कार

## चांगलं काम करणारांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणं हे माझं कर्तव्य समजतो–माजी नगराध्यक्ष दिपक (नाना) देशमुख

**परळी | प्रतिनिधी**

संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आझाद मैदान येथे झालेल्या मराठा समाजाच्या ऐतिहासिक आरक्षण लढ्यात प्रत्यक्ष सहभागी झालेल्या परळी वैजनाथ येथील मराठा सेवकांचा श्री सप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. परळी व पंचक्रोशीतील मराठा बांधव व त्यांना पाठिंबा म्हणून इतर समाजाचे बांधव मुंबईला मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनात प्रत्येक्ष सहभागी झाले होते.ऊन, पाऊस, वारा याची पर्वा न करता आपल्या पुढील पिढीच्या भविष्यासाठी मराठा बांधव लाखोंच्या



संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी केलेल्या मागण्या महाराष्ट्र शासनाकडून पूर्ण केल्या गेल्या, मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला यश आले. दादांच्या प्रयत्नाने मराठा बांधवांनी हि लढाई लढुन जिंकली म्हणून श्री सप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेच्या वतीने दि.०३/०९/२०२५ रोजी सायं. ७:०० वा. परळीचे माजी नगराध्यक्ष दिपक (नाना) देशमुख यांनी मराठा सेवक यांच्या सह ओबीसी समाज बांधवांचा पेढे भरवत पुष्पगुछ देऊन सत्कार केला. चांगलं काम करणारांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणं हे मी माझं कर्तव्य समजतो असे यावेळी बोलताना माजी नगराध्यक्ष दिपक (नाना) देशमुख म्हणाले.मुंबई येथील आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व लढवय्या मराठा आंदोलक उपस्थित राहिले त्याबद्दल श्री सप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष दिपकनाना देशमुख यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनमध्ये 'फ्रेशर्स डे' जल्लोषात

## रॅम्पवॉक, पोवाडा व समूह नृत्याच्या सादरीकरणांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध



**बीड | प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे प्रथम वर्षाच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा 'फ्रेशर्स डे' गुरुवार, दि. ४ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. तर प्रमुख पाहुण्यांमध्ये समाजकल्याण कार्यालय, बीडच्या वरिष्ठ सहायक आयुक्त सौ.कविता गायकवाड, प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट सौ.सुचिता दोडके, वैद्यनाथ बँकेचे मॅनेजर मा. सुरेश काबरा तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनील जोंधळे उपस्थित होते.

प्रा.प्रदीप रोडे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, काळ सतत बदलत असतो, त्या बदलत्या काळाशी जर आपण जुळवून घेतलं नाही, तर या जगात आपलं अस्तित्व टिकवणं कठीण ठरतं. म्हणूनच आजच्या परिस्थितीत केवळ पदवी मिळवणं पुरेसं नाही तर त्यासोबत विविध कौशल्य आत्मसात करणं अत्यावश्यक आहे.आवश्यक कौशल्यं शिकून घेतली, तर तरुण वयातच आपण कमाई सुरू करून स्वावलंबी होऊ शकतो,असे सांगून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. यानंतर विद्यार्थ्यांनी रॅम्पवॉक, पोवाडा व समूह नृत्य अशा जोशपूर्ण कलाविष्कारांनी उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. 'वेलकम फ्रेशर्स २०२५' या संकल्पनेखाली सादर झालेल्या या कार्यक्रमाने नव्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत करून त्यांचा उत्साह द्विगुणित केला. वरिष्ठ विद्यार्थ्यांनी नवप्रवेशितांचे मनापासून स्वागत करत स्नेहबंध अधिक दृढ केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.आश्विनी बेद्रे यांनी करून महाविद्यालयातील उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन विद्यार्थिनी पल्लवी पवार हिने केले, तर आभार प्रदर्शन प्रा.विद्या अवघडे यांनी मानले. प्राध्यापकवर्ग आणि वरिष्ठ विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे संपूर्ण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे पार पडला.

# एमआयडीसीत कामगारांनी सात दिवसाच्या गणपतीला दिला भक्तीमय वातावरणात निरोप

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

एमआयडीसी परिसरात गेल्या सात दिवसांपासून सुरु असलेला गणेशोत्सव मंगलमय वातावरणात पार पडला. स्वराज्य कामगार संघटनेच्या पुढाकाराने एक्साईड कंपनीत स्थापन करण्यात आलेल्या श्री गणेशाची विसर्जन मिरवणूक मंगळवारी (दि.२ सप्टेंबर) पारंपारिक ढोल-ताशांच्या गजरात आणि जल्लोषमय वातावरणात काढण्यात आली. कामगारांनी उत्साहात ठेका धरत गणरायाला निरोप दिला. विशेष म्हणजे या मिरवणुकीत सर्व धर्मीय कामगार एकत्र येत धार्मिक सौहार्दाचे आणि एकात्मतेचे दर्शन घडविले. गणेशोत्सवाच्या सात दिवसांत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सत्यनारायण महापूजेनंतर मिरवणुकीला प्रारंभ झाला. पारंपरिक वाद्यांच्या गजरात महिला वर्गाने सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत सोहळ्याची शोभा वाढविली.

गणेश विसर्जन सोहळ्यास कंपनीचे प्लांट हेड संदीप मुनोत, युवा सेनेचे जिल्हा प्रमुख योगेश गलांडे, स्वराज्य कामगार संघटनेचे अध्यक्ष दत्ता तापकिरे, सौ. हेमा शेळके, मनीषा झावरे, एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद परदेशी, पो.कॉ. उमेश शेरकर, पो.कॉ. सचिन हरदास यांच्यासह कंपनीतील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077